# विश्राम
## आणि
# श्रमणारी लक्ष्मी

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

**विश्राम आणि श्रमणारी लक्ष्मी : साने गुरुजी**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
१५ ऑगस्ट, २०११

**किंमत**
रुपये २००/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

# विश्राम

# लेखकाचे दोन शब्द

या कथासंग्रहात एकंदर चार गोष्टी आहेत. 'विश्राम' ही पहिली गोष्ट. जो श्रमतो, प्रत्यक्ष रात्रंदिवस काम करतो, तोच कसा सदैव दुष्काळात असतो हे तिच्यात दाखविले आहे. आपणच निर्माण केलेल्या दुधातुपातील एक थेंबही आपणास कसा घेता येत नाही, घेतला तर आपणच कसे चोर ठरतो, याचा प्रत्यही येणारा अनुभव या गोष्टीत आहे. 'त्यागानेच शेवटी मंगल होईल', हे या कथेत दाखविले आहे.

दुसरी गोष्ट 'श्यामची आत्या' ही आहे. हे एक सहृदय शब्दचित्र आहे. स्वत: पाहिलेल्या, अनुभवलेल्या गोष्टींच्या स्मृती या शब्दचित्रात आहेत. अपत्यप्रेमाचा अनुभव येण्यासाठी मनुष्याला, विशेषत: स्त्रीला किती उत्कंठा असते, हे त्यात दाखविले आहे. आणि त्याबरोबरच एक प्रकारची समाधानी व सोशिक वृत्ती स्त्रियांमध्ये कशी खिळलेली आहे तेही तेथे प्रस्तुत करण्यात आले आहे.

तिसरी गोष्ट 'शशी'ची. काही मुलांच्या भावना लहानपणीच अत्यंत विकसित झालेल्या असतात; परंतु त्यांच्या पालकांना किंवा त्यांच्या गुरुजनांना या भावना कशा समजत नाहीत व त्या पायाखाली कशा तुडविण्यात येतात, हे डोळे उघडे ठेवून पाहणाऱ्या सहृदय माणसाच्या लक्षात आल्याशिवाय राहात नाही. घरीदारी, शाळेत सर्वत्र एक प्रकारचे अनुदारपणाचे शिक्षण समाजात मिळत असते. हृदयाचा, मनाचा, आत्म्याचा विकास होण्याऐवजी त्यामुळे संकोचच होतो. मनुष्यातील आत्मा सर्व विश्वाला कवटाळू पाहात असतो; परंतु आपण शिकवून या उड्डाण करणाऱ्या आत्म्याला - पशुपक्षी, वृक्ष-वनस्पती, यांच्याशी एकरूप होऊ पाहणाऱ्या आत्म्याला- या शरीरात कोंडून राहण्यात आनंद मानावयास लावीत असतो. या

शरीराचीच फक्त काळजी घेण्यासाठी शिकवीत असतो. मला काय दुसऱ्याचे, मला काय मानवेतर सजीवनिर्जीव सृष्टीचे, हे शिकवीत असतो. तसेच समाजात, 'तोंडात एक व कृतीत दुसरे', असेही दिसत असते. ओठांवर देशभक्ती, पोटात स्वार्थ! ओठांवर विश्वप्रेमाच्या गोष्टी, कृतीत केवळ प्रेमशून्यता ! ओठांवर धर्म; पोटात सारी घाण! 'शिवी कोणी देऊ नये' ही कविता मुलांना शिव्या देत देत मास्तर शिकवितात! सर्व जगातील लोकांना 'नमो नमो' म्हणणाऱ्या ऋषीचे रुद्रसूक्त तोंडाने म्हणत असता एकीकडे 'शिवू नको, तू नीच आहेस' असे आपण म्हणत असतो. अशा वर्तनाचा मुलांवर, समाजावर काय परिणाम होत असेल याचा सर्वांनी विचार करावा.

'शशी'च्या गोष्टीत मुख्य वस्तू आहे ती हिंदू-मुसलमानांसंबंधीची. माझ्यावर या गोष्टीमुळे खूप टीका होतील, याची मला जाणीव आहे. परंतु ज्याने-त्याने स्वतःच्या हृदयाशी व स्वतःच्या श्रद्धेशी प्रामाणिक राहिले पाहिजे. दुसऱ्याला किंवा स्वतःला सुधारण्याचा मार्ग नेहमी शिव्या देणे हा नव्हे. 'अहं ब्रह्माऽस्मि त्वं, तत्त्वमसि' हा सर्वांना सुधारण्याचा पंथ उपनिषदांनी दिला आहे. 'मी चांगला आहे, मला चांगले होता येईल,' असा निदिध्यास लागूनच मी चांगला होईन. 'तू चांगला आहेस, तू चांगला होऊ शकशील,' असे दुसऱ्याला सदैव उत्तेजन दिल्यानेच तो चांगला होण्याचा संभव अधिक. शिक्षणशास्त्रात असा एक नियम आहे की, मुलाला 'तू दगड आहेस, धोंडा आहेस,' असे म्हटल्याने तो मुळात दगड-धोंडा नसला तरी होतो. आपल्या लादलेल्या श्रद्धेचे ते फळ असते. काठेवाडात 'दक्षिणामूर्ती' नावाची एक विख्यात शिक्षणसंस्था भावनगर येथे आहे. त्या संस्थेतील छात्रालयाच्या चालकांनी काही अनुभव मागे प्रसिद्ध केले होते. एका मुलाला सर्वांनी 'तूच चोर आहेस, तूच चोर आहेस,' असे म्हटल्यामुळे खरोखरच त्या मुलाने एक दिवस ऑफिसातच कशी चोरी केली, ते त्यात दिले आहे. चोरी करून गेल्यावर त्या मुलाने पत्र पाठविले:

'सर्व मुले व गुरुजी, तुम्हीही मला चोर चोर म्हणू लागलेत. मला वाटले की, चोर चोर म्हणतातच एवीतेवी - तर करू देच चोरी. बघू या आहे का माझ्यात चौर्यकर्मकुशलता ! तुमच्या कचेरीतच मी चोरी केली! मी यशस्वी झालो. त्या चोरलेल्या नोटा मी माझ्याबरोबर आणल्या आहेत. तुमच्या खोलीतील टोपलीत मी त्या ठेवल्या आहेत. तुम्ही त्या घ्या. मला पैशांची जरूर नव्हती. तुम्ही मला जे म्हणत होता, तसे व्हावेसे मला वाटले ! दुसरे काय?'

चालक त्या अनुभवाच्या शेवटी म्हणतात, 'मी मुलांना शिकवीत होतो; परंतु त्या मुलाने शिक्षणशास्त्रातील महत्त्वाचा सिद्धांत मला शिकविला. माझे डोळे उघडले !'

शिक्षणशास्त्रातील हे महनीय सूत्र समाजात परस्परांशी वागताना आपण सदैव डोळ्यांसमोर ठेवले पाहिजे. 'लांडे-मुसंडे सदैव बायकाच पळविणार, नेहमीच गायीच मारणार', असे आपण म्हणत राहिलो, तर न पळविणाऱ्या मुसलमानांच्याही मनात येईल की, 'बघावी एखादी मुलगी पळवून, मारूया गाय ! वाईट म्हणतातच, तर होऊ देच वाईट !'

चार दिवसांपूर्वीचीच गोष्ट. मी माझ्या खोलीत बसलो होतो. भिंतीवर कविवर्य रवींद्रनाथांचे चित्र होते. छातीवर दाढी रुळत आहे असे ते चित्र होते. वाड्यातील एक आठ वर्षांचा मुलगा माझ्या खोलीत आला, त्याने ते चित्र पाहिले. तो म्हणाला, ''मुसंड्याचे चित्र आहे. मुसंडा येथे कशाला?'' मी त्याला म्हटले, ''असं म्हणून नये. मुसलमानही चांगले असतात.'' तो म्हणाला, ''मुळीच नाही. मुसंडे अगदी वाईट असतात!''

त्या मुलांच्या तोंडचा 'मुसंडा' शब्द सुरीप्रमाणे माझ्या हृदयात शिरला! लहान मुले; परंतु केवढे भयंकर विष त्यांच्या बालबुद्धीत व बालहृदयात भिनविण्यात येत आहे! अर्थात हे भिनविणे हेच ज्यांचे ध्येय असेल, त्यांना हा माझा अनुभव वाचून अमृतसिद्धी व मोक्षप्राप्ती झाल्याचा आनंद होईल, यात शंका नाही. महाराष्ट्राची भावी पिढी कशी मुसंडे-द्वेष्टी होत आहे, असे मनात येऊन त्यांना कृतार्थता वाटेल! या जगात एकाचा आनंद ते दुसऱ्याचे दुःख असते! एकाचा मोक्ष तो दुसऱ्याचा नरक असतो! दुसरे काय?

एका गावी खादी विकावयास गेलो असता, 'ही खादी आम्ही घेणार नाही. खादीच्या धंद्यात कातणाऱ्या मुसलमान बाया, तसेच मुसलमान पिंजारी वगैरेंना काम मिळते. मुसलमानांना घास देणारी खादी आम्हाला नको. त्यापेक्षा मँचेस्टरचा कपडा आम्ही पसंत करू.' असे एका सद्‌गृहस्थांनी मला स्वच्छ सांगितले. आम्हाला सत्ताधीश इंग्रज मित्र वाटत आहेत आणि मुसलमान शत्रू वाटत आहेत ! ज्यांचे हे ध्येय असेल, त्यांना माझा हा अनुभव गुदगुल्या करणारा वाटेल. माझ्या डोळ्यांतून पाणीच आले ! आपल्या घराजवळचा माणूस जर सर्वस्वी बेकार केला तर तो बुभुक्षित मनुष्य शेवटी आपल्यालाच लुटील, हे साधे तत्त्वही काहींच्या लक्षात येत नाही!

मला एक मित्र म्हणाले, 'या गोष्टीत तुम्ही हिंदू वाईट दाखविले आहेत आणि मुसलमान चांगले दाखविले आहेत.' मी म्हटले, 'शशी हा कोण आहे? माझ्या थोर हिंदू संस्कृतीचे ते गोड फळ आहे. ज्या हिंदूंत शशीसारखे रत्न मी दाखविले आहे, त्या सर्वांना मी वाईट दाखविले, असे कसे तुम्ही म्हणता? शिवाय, दुसऱ्या समाजाबद्दल अधिकच सहानुभूती मला असली पाहिजे. नेहमी आपला स्वभाव असा आहे, की स्वत:चा मोठा दोष लहान दिसतो व स्वत:चा अल्पसा गुणही फार मोठा वाटतो, याच्या उलट, दुसऱ्यांच्या दोषाचे कुसळ मुसळाएवढे दिसते व दुसऱ्याचा एखादा महान गुणही तुच्छ वाटतो. म्हणून सत्यशोधकाला याच्या उलट प्रमाण धरणे भाग आहे. स्वत:चा दोष लहान दिसला तर तो मुळात मोठा असला पाहिजे. स्वत:चा गुण मोठा दिसला तर तो तेवढा नसला पाहिजे; दुसऱ्याचा गुणसिंधू असेल, अशीच दृष्टी साधकाला साजून दिसते.'

ज्या समाजावर मी फार प्रेम करू शकत नाही, त्याच्यावर फार रागावण्याचा मला अधिकार नाही. आधी प्रेम करावे, सेवा करावी; मग रागावण्याचा व मारण्याचा हक्क पोहोचतो ! मुसलमान समाजावर मी कोरडे का ओढू? मला त्यांची आधी प्रेमसेवा करू दे, सहृदयतेने त्यांची संस्कृती, त्यांचा धर्म अभ्यासू दे, त्यांच्यातील चांगले घेऊ दे. ते जगाला दाखवू दे; मग त्यांच्यावर रागावण्याचाही अधिकार मला मिळेल.

हिंदू समाजावर रागावण्याचा मला अधिकार आहे. हिंदू संस्कृतीचा मी सहृदयतेने अभ्यास केला आहे. हिंदू संस्कृतीतील महान ध्येये मला सद्‌गदित करतात! ती ध्येये दूर लोटणाऱ्या माझ्या घरातील भावावर मी थोडेफार रागावू शकतो. ज्यांना मी प्रेमाने आपले मानू शकतो, त्यांच्यावर मी रागावलो आहे. ज्यांच्यावर अद्याप फार प्रेम करण्याचे मला सामर्थ्य नाही, त्यांच्यावर प्रेम करावयास शिकून, त्यांच्यावरही रागावण्याचा अधिकार मला कधी काळी प्राप्त होईल.

ज्याने त्याने आपापल्या ध्येयाची पूजा करावी. मग त्या ध्येयाची पूजा करणारा एकटा असो वा कोट्यवधी असतो.

चौथी गोष्ट 'मोलकरीण'. अधिकार व संपत्ती हातात आल्याने मनुष्य स्वत:च्या गरीब मायबापांनाही कसा विसरतो, साहेब बनल्यामुळे खेड्यातील साधेपणाने राहणाऱ्या आपल्या आईबापांस ओळख देण्याचेही धैर्य त्याला कसे होत नाही, याचे चित्र या चौथ्या गोष्टीत आहे. अशा गोष्टी महाराष्ट्रात अनेक घडलेल्या मला माहीत आहेत. त्यात अतिशयोक्ती नाही; परंतु शेवटी अहंकाराचा समूळ अस्त होऊन प्रेमाचा मंगल सूर्य उगवलेला या गोष्टीत दाखविला आहे.

अशा या चार गोष्टी आहेत. 'मोलकरीण', 'शशी' व 'विश्राम' या तीन गोष्टी नाशिकच्या तुरुंगात १९३२-३३ मध्ये लिहिल्या गेल्या. 'श्यामची आत्या' हे शब्दचित्र १९३० मध्ये अंमळनेरच्या 'विद्यार्थी' मासिकासाठी मी लिहिले होते. तुरुंगात 'मोलकरीण' ही गोष्ट एका रविवारी मी वाचून दाखविली होती. स्वत:च्या वडिलांशी कठोरपणे वागत आलेले माझे एक मित्र तेथे होते. ती गोष्ट ऐकून ते रडले. त्यांनी दुसऱ्या दिवशी आपल्या वडिलांना एक क्षमायाचनेचे करुण व विस्तृत असे पत्र पाठविले. 'शशी'ची गोष्टही अशीच मी एके दिवशी वाचून दाखविली. घरच्या मुलामाणसांशी नेहमी कठोरपणे वागणारे एक मित्र तेथे होते. त्यांच्या जीवनात 'शशी' ने प्रकाश आणिला. त्यांनी घरी पत्र लिहिले, 'मी येईन, तो प्रेमळ होऊन येईन, जीवनात क्रांती होऊन येईन.'

अशा प्रकारे या दोन गोष्टी कृतार्थ झाल्या. 'शशी'ची गोष्ट मी काही छात्रालयांतून, काही शाळांतूनही सांगितली आहे. विलक्षण परिणाम झालेला मी पाहिला आहे. अर्थात या गोष्टीवर जी टीका होईल, तिचे आघात सोसावयास माझा माथा नम्रपणे तयारच आहे.

भरलेले हृदय रिकामे होईपर्यंत लिहावयाचे! दुसरे कलातंत्र मला येत नाही व साधत नाही. तंत्रमंत्रमय कलेचा येथे कदाचित खूनही असेल. कोणाला माहीत?

हनुमान जयंती, शके १८५९

**– पां. स. साने**

# अनुक्रमणिका

## विश्राम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | विश्राम | .......... | १३ |
| २. | श्यामची आत्या | .......... | २५ |
| ३. | शशी | .......... | ३७ |
| ४. | मोलकरीण | .......... | ८१ |


## श्रमणारी लक्ष्मी


| | | | |
|---|---|---|---|
| ५. | अभिवादन | .......... | १२३ |
| ६. | प्रास्ताविक | .......... | १२५ |
| ७. | जनी | .......... | १२९ |
| ८. | धर्मा | .......... | १४१ |
| ९. | काकडीवर जगणारी मायलेकरे | .......... | १४९ |
| १०. | कलिंगडाच्या साली | .......... | १५३ |
| ११. | दुसरे वस्त्र नाही | .......... | १५७ |
| १२. | गोपाळ | .......... | १६० |
| १३. | पाला खाणारी माणसे | .......... | १६३ |
| १४. | हिंग कामगारांचे हाल | .......... | १६६ |
| १५. | पडका धक्का | .......... | १७० |
| १६. | श्रमणारी लक्ष्मी | .......... | १७७ |
| १७. | जयंता | .......... | १८६ |
| १८. | शुक्री | .......... | १९२ |
| १९. | रामकृष्ण | .......... | २०५ |


✦✦✦

# १. विश्राम

दिनकरराव म्हणून एक जमीनदार होते. ते सावकारीही करीत असत. घरी भरपूर पैसा होता. शेतीवाडी पुष्कळ होती. गाईगुरांचे मोठे खिल्लार होते. त्यांच्याजवळ सारे होते; फक्त एकच गोष्ट त्यांच्यापाशी नव्हती. थोर व उदार हृदय – त्याची देणगी मात्र त्यांच्यापाशी नव्हती. ते अनुदार होते. कृपण होते. गरिबांच्या कधी उपयोगी पडत नसत. दुसऱ्यांच्या जीवनाची कल्पना त्यांना कधी येतच नसे. ते केवळ स्वत:पुरते पाहणारे होते.

त्यांच्या घरी विश्राम म्हणून एक गडी होता. विश्रामला दिवसभर त्यांचे काम करावे लागे. काम करून तो थकून जाई. तो गुरांचे दूध काढी, गोठा झाडी, लाकडे फोडी, धुणी धुई, भांडी घाशी, शेतात खत वाही. सारा दिवस काम. रात्री नऊ वाजता तो घरी जाई. दिनकररावांकडे तो जेवूनखाऊन होता. जेवूनखाऊन वर्षाला तीस रुपये ते देत. त्याला जेवायला शिळेपाके वाढीत, पोटभर जेवणही त्याला मिळत नसे.

विश्रामच्या घरी त्याचा म्हातारा बाप होता. तो अजूनही मोलमजुरी करीत असे. विश्राम रात्री घरी आला म्हणजे बाप त्याला म्हणे, ''दमतोस हो पोरा. गरीब बापाच्या पोटी आलास, खपून खावे लागते. काय करायचे?'' बापाचे असे शब्द ऐकून विश्रामला वाईट वाटे. तो म्हणे, ''बाबा, तुमचा गोड शब्द ऐकला की सारा थकवा जातो. तुमचे वय झाले, तरी तुम्हाला मजुरी करावी लागते. माझा पगार मालकाने थोडा

वाढविला तर तुम्हाला अशा म्हातारपणी काम करावे लागणार नाही; परंतु आहे तोच पगार मालक कमी करू बघत आहे! बाबा, बाबा, मुंबईस जाऊ का? मिलमध्ये मिळेल नोकरी – दोन दिडक्या जास्त मिळतील. तुम्हाला पाठवीन.'' विश्रामचे बोलणे ऐकून म्हातारा म्हणे, ''नको रे बाबा, मिलबिल नको हो! अरे, इथली मोकळी हवा, हे अंगण, ही शेतेभाते, गाईगुरे – हे शहरात पाहायला मिळेल का? तेथे ना जागा, ना प्रेमाचे कोणी. दोन घंटे काम जास्त करू, पण येथेच राहू. शहर नको. माझी शपथ आहे विश्राम, तुला. तुम्ही दोघे येथेच राहा. सगुणा पोर मोठी चांगली आहे. शहरात नेऊन तिची माती नको करू. शहरात गरिबाला अब्रूने राहणे कठीण. नाना व्यसने, नाना प्रकारचे लोक तेथे. येथेच कोंड्याचा मांडा करून खावा. टिळ्याटाकळ्याची भाजी करावी, पण शहर नको.'' म्हातारा विश्रामकडून कबूल करून घ्यायचा.

विश्रामची बायको सगुणा. तीही दळणकांडण करायला जाई. विश्रामच्याच मालकाकडे तिला दळणकांडण करायला जावे लागे. तेथे जाणे तिला आवडत नसे. पण विश्रामवर धन्याचा राग होऊ नये म्हणून ती जाई. सगुणा सकाळी उठून झाडलोट करी, नंतर भाकरी करी. म्हाताऱ्याला खायला देई. विश्राम थोडी खाई व ती पण खाई. नंतर सारी कामाला जात. अजून सगुणाला मूलबाळ झाले नव्हते. कुटुंब लहान होते; तरी विश्रामचे ते तीस रुपये – वर्षाचे तीस रुपये किती पुरणार?

एके दिवशी सगुणा विश्रामला म्हणाली, ''अलीकडे माझे कपाळ फार दुखते. दिवसभर दळणकांडण करते, परंतु कसे करते ते माझे मलाच ठाऊक! आज फार वेदना होत आहेत – सारखा ठणका लागला आहे. काय करावे?''

विश्राम म्हणाला, ''पित्त झाले आहे. परंतु आपणाला कोठे मिळणार दूध नि बीध? कसलीशी गोळी उगाळून दुधातून देतात पित्तावर. परंतु मी कोठून आणू दूध? गरिबांना देवाने कधी आजारी पाडू नये. श्रीमंतांनी दुखण्याचा मक्ता घ्यावा. संपत्ती ते घेतात, दुखणी त्यांनीच घ्यावी. औषधाला पैसे तरी त्यांच्याजवळ असतात. गरिबांना आजारी पडून कसं चालेल? उद्या तू कामाला जाऊ नकोस.''

सगुणा म्हणाली, ''कामाला न जाऊन कसे चालेल? मामंजी म्हातारे झाले तरी कामाला जातात. मी तरणीताठी पोर. मला घरात बसण्याची लाज वाटते. काम



करायला नाही हो मी कंटाळले! हातपाय धड असल्यावर काम करायला काय झाले? परंतु हे कपाळ मेले भारीच दुखते हो!''

विश्राम म्हणाला, ''कपाळाला तेल चोळीन म्हटले, तर तेलसुद्धा घरात नाही. नुसते दाबून देऊ?''

सगुणा म्हणाली, ''तुम्ही दिवसभर दमता; तुम्हाला सांगायला धीर नाही होत.''

विश्राम सगुणाचे कपाळ दाबू लागला. विश्रामच्या हाताला एक फोड आला होता. सगुणेला तो कळला. सगुणा त्याचा हात हातात घेऊन म्हणाली, ''हे काय, केवढा फोड! काय लागले हाताला?''

विश्राम म्हणाला, ''त्या दिवशी लाकडे फोडीत होतो, तो एक लाकूड उडाले, हातावर जोराने बसले. ते अजून बरेच होत नाही. पुन: पुन्हा आत पाणी जाऊन सुजते. होईल बरे.''

सगुणा कष्टी होऊन म्हणाली, ''खरेच तुम्हाला त्यांच्याकडे फार पडते काम. मी परवा तेथे कांडण करीत होते. तुम्ही ते अंगण खणीत होता. दमल्यामुळे तुम्ही जरा बसला होता, तो एकदम अंगावर तो मालक ओरडला. क्षणभरही तो तुम्हाला बसू देत नाही. ते सारं अंगण तुम्ही एकट्याने खणले आणि हाताला असा फोड आलेला! मालकाला दया नाही का हो येत? कांडता कांडता मला रडू येत होते तुमचे हात पाहून.''

विश्राम म्हणाला, ''तुला सारखे उभे राहून कांडताना पाहून मला रडू येत होते. सगुणे, एकाने रडावे न् एकाने हसावे, असेच हे जग आहे. काहीही काम न करता मालकाला, त्याच्या मुलांना सारे मिळते; परंतु दिवसभर काम करूनही आपणाला पुरेसे नाही! देवाला हा अन्याय कसा पाहवतो? आता कपाळ जरा बरे आहे का?''

सगुणा म्हणाली, ''बरे वाटते, तुम्ही आता झोपा.''

विश्राम म्हणाला, ''उद्या धन्याला थोडे दूध देता का विचारीन.''

सगुणा म्हणाली, ''तो काही देणार नाही. श्रीमंत श्रीमंताला देतील, परंतु गरिबाला नाही देणार!''

दुसऱ्या दिवशीही सगुणा कपाळ अति दुखत होते तरी कामाला गेली. विश्रामही नित्याप्रमाणे गेला. म्हातारा कामावर गेला नव्हता. तो घरीच होता. अंगणाच्या कडेला लावलेल्या वेलांना तो पाणी घालत होता. कामाचे शरीर–थोडेफार काम केल्याशिवाय त्याला बरेच वाटत नसे.

त्या रात्री थोडे दूध घेऊन जायचे, असे विश्रामने ठरविले होते. लहानशी लोटी त्याने बरोबर आणली होती. त्याचे एक मन त्याला सांगे, 'विश्राम, विचारल्याशिवाय नेणे ही चोरी आहे. चोरी करू नको. मेलास तरी चालेल, पण चोरी नको.' त्याचे दुसरे मन म्हणे, 'चोरी कसची? चोर कोण? या गाई-म्हशींची सेवा-चाकरी मी करतो. त्यांचा गोठा मी झाडतो, मी त्यांना धुतो, त्यांना चारा घालतो. माझा आवाज ऐकताच गाई-म्हंशी हंबरतात, माझ्यावर त्यांचे किती प्रेम! या गाई-म्हशींच्या दुधावर माझी सत्ता नाही का? त्यांचे दूध मी घेतले तर ती का चोरी होईल? धनी चोर आहे! तो फु कट खातो. मीच या दुधाचा मालक आहे.' विश्रामच्या मनात दिवसभर झगडा चालला होता. धनी चोर का आपण चोर, हे तो ठरवीत होता.

सायंकाळ झाली. विश्रामने धार काढली. साऱ्या दुभत्या ढोरांचे दूध काढता काढता त्याची बोटे थकून जात असत. एवढ्या दुधातील अदपाव दूध त्याने घेतले, तर ती का चोरी? नाही - बिलकुल नाही. विश्रामने, ती पाहा लोटी भरून ठेवली. गोठ्यात लपवून ठेवली. तो देवाला म्हणाला, 'सगुणाला बरे वाटले म्हणजे नाही घेणार. ती जर आजारी पडली तर सारीच पंचाईत पडेल. ती घरलक्ष्मी. ती धडधाकट हवी. देवा, अपराध होतच असेल तर क्षमा कर.'

रात्री सारे काम आटोपल्यावर विश्राम ती लोटी घेऊन निघाला. ती लोटी लपवीत लपवीत तो चालला होता. तो घरी गेला. सगुणा वाटच पाहात होती. विश्राम तिला म्हणाला, ''सगुणे, हे घे थोडे दूध. दोन दिवस कडकडीत तापवून घे म्हणजे डोके दुखणार नाही.''

सगुणेने विचारले, ''तुमच्या मालकाने दिले वाटते? दगडाला घाम आला आज!''

विश्राम म्हणाला, ''तू ते तापत ठेव.''

सगुणेने दूध तापवले. ती म्हणाली, ''सारे मी एकटी का घेऊ? मामंजींना दोन घोट द्या, थोडे मी घेईन.''

विश्राम म्हणाला, ''तू आजारी आहेस, तूच घे; आम्हाला नको. आहे कितीसे?'' तरीही सगुणेने थोडे दूध म्हाताऱ्याला नेऊनच दिलेच. ''कोठले गं दूध पोरी?'' त्याने विचारले.

विश्राम म्हणाला, ''मालकाकडून आणले होते थोडे. हिचे रोज डोके दुखते - म्हटले थांबेल.''



म्हातारा म्हणाला, ''मग मला गं कशाला? तुम्ही घ्या पोरांनो. तुम्हालाच आता जगायचे आहे. संसार करायचा आहे. माझे काय आता म्हाताऱ्याचे!'' सगुणेच्या व विश्रामच्या आग्रहाने म्हाताऱ्याने घोटभर दूध घेतले. नंतर सगुणा विश्रामला म्हणाली, ''तुम्ही एवढे हातावर तरी घ्या.'' विश्रामने आपला हात पुढे केला व त्याच्यावर सगुणेने दूध घातले. ''आता हे मी पिऊ? खरेच पिऊ?'' तिने विचारले. ''पी. माझी काही दृष्ट नाही पडणार!'' हसत विश्राम म्हणाला.

एके दिवशी रात्री विश्राम पुन्हा असेच दूध घेऊन घरी येत होता. वाटेत दुसरा एक गडी भेटला. तो विश्रामला म्हणाला, ''विश्राम, काय रे ते लपवीत चालला आहेस?'' विश्राम म्हणाला, ''दूध.'' त्याने विचारले, ''मालकाने दिले वाटते? बराच उदार झाला मालक तुझा!'' विश्राम म्हणाला, ''औषधाला घेऊन चाललो आहे.''

त्या दुसऱ्या गड्याला नोकरी मिळत नव्हती. विश्रामच्या गृहसौख्याचा तो मत्सर करी. गरिबा-गरिबांतही द्वेष-मत्सर आहेच. महिना दोन रुपये मिळविणारा पाच रुपये मिळविणाऱ्याचा हेवा करतो! सारी दुनिया द्वेषमय आहे, मत्सराचे साम्राज्य सर्वत्र पसरले आहे. ते दूध धन्याला न विचारता विश्राम घेऊन जात असला पाहिजे, असे त्या दुसऱ्या गड्याला वाटले. कारण विश्रामच्या धन्याची कृपणता व निष्ठुरपणा जगजाहीर होता. दगडाला पाझर फु टेल, मुसळाला अंकुर येईल, परंतु दिनकररावास दया येणार नाही, असे सारे म्हणत. आपण विश्रामच्या धन्याला सांगावे म्हणजे तो विश्रामला नोकरीवरून काढून टाकील व कदाचित आपल्याला ठेवील, असे त्या गड्याच्या मनात आले.

दुसऱ्या दिवशी तो मत्सरी गडी दिनकररावांना भेटला व म्हणाला, ''तुम्ही विश्रामला कशाला ठेवले कामावर? विश्राम अप्रामाणिक आहे. तो तुम्हाला फसवितो. रोज रात्री दूध चोरून नेतो. मला कामावर दोन रुपये कमी द्या. मी इमानेइतबारे नोकरी करीन.''

दिनकरराव म्हणाले, ''बघू, तुला ठेवायचे झाले तर कळवीन. आता जा, कामात आहे.''

दिनकरराव आधीच दुष्ट, त्यातच हे विष त्यांच्या कानात ओतलेले! विश्रामच्या पाळतीवर राहावयाचे असे त्यांनी मनात ठरविले. रात्र केव्हा होते याची वाट पाहात

होते. सर्प जसा दंश धरून बसतो, त्याचप्रमाणे ते बसले होते. रात्र झाली, दुधे वगैरे काढून झाली, विश्रामने गुरांना चारा वगैरे घातला. त्याचे जेवण झाले. परवानगी घेऊन तो जाण्यास निघाला. हळूच गोठ्यात जाऊन ती लोटी त्याने घेतली. अंगावरच्या घोंगडीत ती लपवीत तो चालला.

विश्रामच्या पाठोपाठ तो पाहा कृष्णसर्प जात आहे. काही अंतरावर विश्राम गेला तोच दिनकररावांनी त्याला गाठले. सर्पाप्रमाणे फुत्कार करून त्यांनी विश्रामला पकडले, ''हरामखोर! कोठे रे चालला दूध घेऊन? रोज आम्हाला असे लुटतोस तू चोरा! चांगला आहे उद्योग! आम्ही म्हणत होतो, 'विश्राम गरीब आहे;' परंतु तू तर बिलंदर. तुला पोलिसांच्याच ताब्यात देतो, चल.''

''धनीसाहेब, माझी बायको आजारी आहे, म्हणून हे थोडे दूध नेत आहे. आजचा चौथा दिवस. सात दिवस औषध द्यावयाचे आहे. तिचे डोके फार दुखते. काय करावे गरिबांनी! चोरी करावी, लुबाडावे हा हेतू नाही. तुमच्याच घरातला नाही का मी? दिवसभर तुमच्या घरी नाही का राबत? मी का परका आहे?'' विश्राम गयावया करून म्हणाला.

धनी संतापाने म्हणाला, ''चांगला आहे न्याय! म्हणे, 'गरिबांनी काय करावं?' आणि आम्ही रे काय करावे? त्या लहान रामाला दूध लागते, रंगूला द्यावे लागते, तिला लापशीसाठी लागते – आमच्या घरीच पोराबाळांना पुरत नाही तर तुला कोठून द्यावयाचे? चोर तो चोर, पुन्हा शिरजोर! तुला मी पोलिसांच्याच ताब्यात देतो. लाज नाही रे वाटत बोलायला? पण चल, आधी तुझ्या बापाकडेच चल. त्या म्हाताऱ्याला सांगतो, की बघ तुझा पोरगा. हो पुढे चोरा!''

विश्राम खिन्नपणे चालू लागला, त्याच्या पाठोपाठ हातात काठी घेतलेले दिनकरराव चालू लागले. विश्राम अजून घरी का आला नाही म्हणून म्हातारा वाट पाहात होता. सगुणाही सचिंत बसली होती. म्हातारा सगुणेला म्हणाला, ''आज पोराला बरीच रात्र झाली.'' सगुणा म्हणाली, ''त्यांच्याकडे कामच भारी! सारा दिवस बैलावाणी राबवितात.''

''हो, बैलावाणी राबवितो. उद्यापासून नकोच राबायला. अशा चोराला कोण कामावर ठेवणार?'' दिनकरराव अंगणात येऊन ओरडले. म्हातारा चकित झाला. तो म्हणाला, ''पोरी, घोंगडी पसर ती. या बसा. आता रातचे कोणीकडे?''



''घोंगडी वगैरे काही नको. तुझा मुलगा विश्राम चोर आहे. तो रोज दूध चोरून आणतो, तरी काही तू मला सांगितले नाहीस आणि तूही म्हाताऱ्या, या चोरीत सामील झालास वाटते? ही पाहा भरलेली लोटी. मुद्देमाल. सांगोवांगीच्या गोष्टी नाहीत या. आज याने दूध चोरले. ते पचू लागले म्हणजे उद्या आमच्या पोराबाळांच्या अंगा-खांद्यावरचेही लांबवायचा हा! याला पोलिसांच्याच ताब्यात देतो.'' दिनकरराव ऐटीत उभे राहून बोलत होते. शेजारचे लोकही जमा झाले.

विश्राम मान खाली घालून उभा होता. सगुणा घरात जाऊन रडू लागली. ''हे सारे माझ्यामुळे झाले. कपाळ दुखते असे मी सांगितले नसते तर?'' असे मनात म्हणून ती जिवाला लावून घेती झाली. म्हातारा शरमिंदा झाला. त्याच्याने काही बोलवेना. शेवटी तो म्हणाला, ''विश्राम, पोरा कुळाला बट्टा की रे लावलास! अरे, बापजाद्यांनी कधी कुणाच्या चिंधीला का काडीला, दोरीला सुद्धा नाही हात लावला. धनी दूध देतो म्हणून त्या दिवशी खोटे सांगितलेस, ते चोरीचे दूध मला आग्रह करून पाजलेस. त्यापेक्षा विष का नाही पाजलेस मला? साऱ्या गावात आता छी-थू होईल. मी मेल्यावर असे करायचे होतेस. आजारी पडून ती मेली असती तरी काय बिघडले असते? चोरी करून जगण्यापेक्षा मेलेले काय वाईट? कोठे फेडशील हे पाप? कष्टाचा कोंडा बरा. कष्टाचे मिळेल ते अमृत आहे. नसेल खायला तर धोंडे चघळावे; परंतु चोरी नको. दादा, पोलिसांच्या ताब्यात नका देऊ. एवढी कृपा माझ्यावर करा. या पांढऱ्या केसांची कीव करा, आणखी नका बेअब्रू करू. घरात या पोरीलाही धक्का बसेल.'' असे म्हणून तो थोर म्हातारा त्या कृपणाच्या पाया पडला.

दिनकरराव म्हणाले, ''बरे, एक वेळ सोडतो. परंतु आमच्या घरी उद्यापासून विश्राम कामाला नको. हे विकत सर्प कशाला घ्यायचे?'' असे म्हणून दिनकरराव काठी आपटीत निघाले.

विश्राम अंगणात रडत होता. ओसरीवर म्हातारा सचिंत होता. सगुणा घरात रडत होती. दिनकरराव घरी जात होते. बाहेर अंधार होता. दगडावर काठीचा आवाज करीत दिनकरराव चालले होते. तोच फुस्स आवाज झाला. भयंकर सर्प! दिनकररावांना कडाडून चावा घेतला त्याने. ''अरे साप चावला, साप चावला, धावा रे-'' दिनकरराव ओरडले. लोक हातात कंदील व काठ्या घेऊन धावत आले. काही लोक सापाला शोधू लागले. काहींनी दिनकररावांना उचलून विश्रामच्या अंगणात नेले. साप काही